# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद

## मोड्यूल क्र. 2

### बहुभाषिक क्षेत्रातील शालेय नेतृत्वाची भूमिका

**प्रस्तावना :**




विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणणे हे प्राथमिक शिक्षणाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रत्येक बालकास मिळाले पाहिजे, यासाठी शाळेतील मुख्याध्यापक तसेच शिक्षक यांची भूमिका महत्वाची असते. मूल जेव्हा प्राथमिक शाळेत शिकत असते तेव्हा त्यांच्यासमोर असणारा शिक्षक त्यांचा आदर्श असतो. शिक्षकाच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडत असतो.विद्यार्थी शिक्षकाचे अनुकरण देखील करत असतो.मुलांचा शिक्षकांवर खूप प्रभाव असतो.

शाळेतील अध्ययन अध्यापन प्रक्रिया म्हणजे मुख्याध्यापक, शिक्षक,विद्ध्यार्थी,पालक,समाज यांच्या आंतरक्रियांचा,आंतरसंबधाचा परिणाम असतो.या आंतरक्रिया जेवढया प्रभावी असतील तेवढा आपल्या विद्यार्थ्यातील क्षमतांचा अधिक विकास होतो.या सर्व प्रक्रियेचा शाळास्तारावरील सूत्रधार म्हणजे मुख्याध्यापक व शिक्षक होय.त्यांना खूप महत्वाची भूमिका पार पाडावी लागते.त्यांच्या क्रियाशीलतेचा परिणाम शिक्षक तसेच विद्यार्थ्यांवर पडत असतो.

भौगोलिक,सामाजिक,सांस्कृतिक,भाषिक विविधतेमुळे आपण फार समृद्ध झालेलो आहोत.असं असताना कधी कधी काही ठिकाणी,काही संदर्भात विविधतेमुळे अध्ययन अध्यापन प्रक्रियेत अडथळे सुद्धा निर्माण होतात.भाषिक विविधतेमुळे त्या भाषांचे व्यवस्थित आकलन झाले नाही तर शिक्षक विद्यार्थी यांच्यातील संवाद संपुष्टात येण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.यामुळे विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होऊ शकते. हे जर टाळायचे असेल तर महाराष्ट्रातील बहुभाषिक परिस्थिती आणि तिचा शिक्षणाशी असलेला संबंध समजावून घेऊन बालकांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.बहुभाषिकता हे भारतीय समाजाचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.त्याचे जतन करून मुलांना यशस्वीपणे बोलीभाषेकडून प्रमाण भाषेकडे घेऊन जाणे ही काळाची गरज आहे.

बोलीभाषेचा संबध जन्मत: मातृभाषेशी अर्थात मायबोलीशी आहे.बोलीभाषा ही सर्व संस्कारांचा खजिना असते.मातेशी बोलीभाषेचा संबंध जोडलेला आहे.मुळात भाषा ही मौखिक स्वरुपात बोलीच असते. त्यामुळे बोलीभाषेचे महत्व यत्किंचितही कमी होत नाही. किंबहुना ते अबाधित राहते.त्यामुळे बोलीतला संवाद हा संस्कृतीहीन,खेडूत, असभ्य मानला जाणे हे अत्यंत चुकीचे आहे. विविध लोकसंस्कृती हे आपल्या भारताचे वैशिष्टय आहे.भाषा आणि संस्कृती तसेच बोलीभाषेविषयी प्रेम बाळगून तिचा स्वीकार करणे व मुलांना प्रमाण भाषेकडे घेऊन जाणे आवश्यक आहे.

भारतातील भाषिक विविधता सर्वज्ञात आहे.भारतामध्ये शेकडो भाषा,बोलीभाषा बोलल्या जातात.भाषिक विविधता ही अधिक खोलवर रुजलेली व अधिक गुंतागुंतीची आहे.आदिवासी,भटके विमुक्त, दलित, अल्पसंख्यांक अशा सामाजिक कमकुवतपणा लादल्या गेलेल्या समाजांच्या भाषा अधिकाधिक प्रमाणात लुप्त होत आहेत.या सर्व मुलांना त्यांच्या मातृभाषेतर किंवा परिचित भाषेतर माध्यमांच्या शाळांमध्ये दाखल करताना त्यांच्या मातृभाषांचा ऱ्हास होणार नाही.त्यांची भाषिक ओळख आदराने जपली जाईल आणि त्याच वेळी व्यवहाराच्या,परिसराच्या आकलनात व आत्मसातीकरणात आणि त्या भाषांवर प्रभुत्व मिळवण्यात ही मुले मागे पडणार नाहीत याची काळजी घेतली गेली तरच अशा दुर्बल समाजघटकांमधील मुलाचं खरंखुरं शिक्षण शक्य आहे.

**शालेय नेतृत्व मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्ट्ये-**

1. बहुभाषिक क्षेत्र विषयक संकल्पना समजून घेणे.
2. बहुभाषिक क्षेत्रात यशस्वीपणे काम करणाऱ्या मुख्याध्यापकांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
3. शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यामध्ये बहुभाषिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकास विषयक दृष्टीकोन विकसित करणे.

**बहुभाषिक क्षेत्र संकल्पना–**

भाषा हा शिक्षणाचा पाया आहे.बोलणे,भावना व्यक्त करणे ,संवाद साधणे,विचार करणे या सर्व क्रियांचे माध्यम आणि स्त्रोत भाषा असते. भाषेशिवाय संप्रेषण किंवा माहितीचे चलनवलन अशक्य आहे.शाळेकरी वयातील मुले ही घराच्या आणि परिसराच्या भाषेतून जगाचा ठाव घेण्याची सुरुवात करतात. हा संवाद भावनिक आणि वैचारिक असतो.व्यक्ती स्वत:च्या भावना किंवा विचार त्याच्या मातृभाषेतून किंवा बोलीभाषेतून अधिक चांगल्या प्रकारे व्यक्त करू शकतो.

देशात किंवा राज्यात अशी अनेक ठिकाण, गावं, आहेत कि त्या ठिकाणी विशिष्ट भाषा बोलणारे लोक आहेत. या भाषांमध्ये शेकडो भाषांच समावेश आहे. गोंडी, माडिया गोंडी, कोलामी,परधनी, पावरी, हिंदी, अहिराणी, मल्हारकोळी, वारली, हलबी, ठाकरी, कोरकू, कातकारी, गोरमाटी, गोसावी,

डोंबारी, पारधी इत्यादी बोलीभाषा महाराष्ट्रात बोलल्या जातात. एक किंवा अधिक भाषा सहज बोलणाऱ्या सक्षम व्यक्तीला बहुभाषिक म्हणतात.जेव्हा एखादया विशिष्ट परिसरात एखादी विशिष्ट बोलीभाषा बोलणारे लोक, कुटुंबे,व्यक्ती असतात. त्याच परिसरात त्या राज्यातील प्रादेशिक भाषा बोलणारे लोक असतात.त्या परिसरातील व्यवहार राजभाषेतून किंवा हिंदी/इतर भाषेतून होतात. त्या परिसरातील मुलांसाठी असलेल्या अंगणवाडी,प्राथमिक शाळा यातून राजभाषेतून प्रादेशिक भाषेतून शिक्षण दिले जाते.अशा परिसरात बोलीभाषा,प्रादेशिक भाषा व अन्य भाषा बोलल्या जातात.या परिसराला बहुभाषिक क्षेत्र असे म्हणतात.काही वेळेला शाळेमध्ये वेगवेगळ्या भाषा बोलणारे विद्यार्थी असतात.या सर्व मुलांना त्यांच्या भाषेसाहित स्वीकारून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे यासाठी शिक्षकाच्या कौशल्याचा कस लागतो.

**बहूभाषिकत्व आणि भाषा अध्ययनाचे सामर्थ्य (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020)**

विद्यार्थ्यांची भाषा आणि अध्ययन अध्यापन प्रक्रिया यांचा खूप जवळचा संबंध आहे. मातृभाषेमुळे विद्यार्थ्यांचे आकलन खूप लवकर होते. अभ्यासक्रमातील कोणतीही संकल्पना ही मातृभाषेमध्ये समजावून सांगितली असता ती लगेच समजते.

साधारणतः परिसरातील भाषा व मातृभाषा सारख्याच असतात, काही ठिकाणी मात्र बहुभाषिक कुटुंबामध्ये कुटुंबातील काही लोक मातृभाषेपेक्षा किंवा परिसर भाषेपेक्षा वेगळ्या भाषेत बोलत असतात.

एकंदरीत भाषेचा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर खूप मोठा प्रभाव असतो. जेथे शक्य आहे त्या ठिकाणी शिक्षणाचे माध्यम म्हणून घरात बोलल्या जाणाऱ्या मातृभाषेचा उपयोग होतो. शाळेत दिले जाणारे शिक्षण हे सुरुवातीच्या काळात मातृभाषेतून किंवा परिसरात बोलल्या जाणाऱ्या भाषेतून असावं त्यामुळे मातृभाषा किंवा परिसरात बोलली जाणारी भाषा ही भाषा म्हणून शिकवली जाईल. सरकारी शाळा तसेच खाजगी शाळांमधून शिकण्या शिकवण्याचे माध्यम म्हणून मातृभाषेचा किंवा परिसरातील भाषेचा वापर करण्यात येईल सर्व प्रकारची व सर्व विषयांची पाठ्यपुस्तके सुद्धा या भाषांमधून उपलब्ध करून दिले जाते त्यामुळे मुलांकडून बोलली जाणारी भाषा आणि शिक्षणाचे माध्यम यामध्ये पडणारी दरी भरून निघेल जेव्हा मातृभाषेतून पाठ्यपुस्तके किंवा तत्सम लिखित साहित्य उपलब्ध नसेल अशा वेळी शिक्षक आणि विद्यार्थ्यांची संवादाची भाषा ही मातृभाषा असावी ज्या ठिकाणी अध्ययन अध्यापनाचे माध्यम विद्यार्थ्यांच्या मातृभाषेपेक्षा वेगळे आहे त्याठिकाणी शिक्षकांनी आवश्यक तिथे व द्वीभाषा सूत्राचा उपयोग करण्याची गरज आहे विद्यार्थ्यांचे मातृभाषा व अध्ययन अध्यापनाची भाषा या दोन्ही भाषांचा शिक्षकांनी गरजेनुसार उपयोग केला तर अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होईल.

सर्व प्रकारच्या भाषा अशा पद्धतीने शिकवण्यात याव्यात की त्यामुळे भाषाविषयक उच्च गुणवत्ता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होईल. भाषा हे केवळ सूचनांचे माध्यम न राहता ती योग्यप्रकारे शिकवली व शिकली गेली जाईल. काही संशोधकांच्या निष्कर्षानुसार दोन ते आठ वर्षे या वयोगटातील मुलं भाषा

पटकन शिकतात. वयाच्या आठव्या वर्षापर्यंत जर मुलांनी मातृभाषेवर प्रभुत्व मिळवलं तर मातृभाषेशिवाय इतर भाषा ही मुलं लवकर शिकतात.

सर्व भाषांचे शिक्षण आनंददायी तसेच परस्पर संवादात्मक पद्धतीने दिले गेले पाहिजे. भाषेचे अध्ययन करताना फक्त शब्द पाठ किंवा वाक्य पाठ करणे पुरेसे नसते तर त्या भाषेतून परस्पर संवाद मुलांना करता आला पाहिजे. तसेच योग्य गतीने व अचूक वाचन व लेखन ही करता यावं. सुरुवातीला मूलभूत स्तरावर मातृभाषा या पद्धतीने शिकवण्यात यावी त्यानंतर इतर भाषांमधील श्रवण,भाषण,वाचन,लेखन व भाषे संदर्भातील इतर कौशल्य विकसित करण्यावर भर दिला गेला तर भाषाशिक्षण अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होईल. इयत्ता तिसरी नंतर इतर भाषा मुलांनी शिकाव्यात. भारतात NEP 2020 अनुसार केंद्र आणि राज्य सरकार प्रादेशिक भाषाविषयक भाषा शिक्षकांची खूप मोठ्या प्रमाणात नियुक्ती करेल आणि विशेष म्हणजे सर्व भाषांचा समावेश भारताच्या संविधानाच्या आठव्या परिशिष्टात मध्ये करण्यात आला आहे.बहुभाषिक शिक्षकांची मदत घेण्यासाठी लगतच्या राज्यांसोबत राज्यांना द्विपक्षीय करार करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल. भारतात काही राज्यांमध्ये द्वीभाषा सूत्र तर काही राज्यांमध्ये त्रिभाषा सूत्राचा अवलंब करण्यात येईल. NEP अनुसार भारतीय भाषांचा शिक्षणामध्ये माध्यम म्हणून अवलंब करण्यासाठी राज्यांना प्रोत्साहित केले जाईल तसेच वेगवेगळ्या भाषा शिकण्यासाठी शिकण्यासाठी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा व्यापक वापर केल्या जाईल.

**बहुभाषिक क्षेत्रातील शालेय नेतृत्वासमोर असलेली आव्हाने**

देशात शाळाशाळामधून आढळणाऱ्या बहुभाषिक वर्गांमध्ये सगळी मुले शिकती न हो ण्याची महत्वाची दोन कारणे म्हणजे बहुभाषिक क्षेत्रामध्ये असलेल्या परिस्थिती विषयीची अनभिज्ञता आणि असंवेदनशीलता होय.

शाळेची मध्यम भाषा आणि घरची किंवा परिसराची भाषा भिन्न असते तेव्हा या असंवेदनशीलतेचा परिणाम मुलांच्या गुणवत्तेवर होतो.काही इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये इंग्रजीतर भाषांमधून अनौपचारिक संवादावर देखील बंदी घालतात. या बाबी मुलांच्या उत्स्फूर्त आणि सर्जनशील अभिव्यक्तीला मोठा अडसर ठरतात. बहुभाषिक क्षेत्रात काम करत असताना विद्यार्थी,शिक्षक, पालक, समाज या सर्वांच्या बाबत अनेक आव्हाने आहेत.ती आव्हाने स्वीकारून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी काय करता येणे शक्य आहे याचा विचार करणे गरजेचे आहे.

## विविध स्तरावरील आव्हाने-

❖ **विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने:**

घरात,परिसरात बोलली जाणारी भाषा मुलांना समजते,बोलता येते.पण शाळेत मिळणारे शिक्षण राजभाषेतून मराठीतून दिले जाते.ती भाषा मुलांना समजत नाही,बोलता येत नाही.शिक्षक,विद्यार्थी संवाद होत नाही.आणि विद्यार्थी शाळेपासून दुरावतो.मुलांची भाषा समजून घेणारे शिक्षक उपलब्ध होत



नाही. संवादाभावी शिक्षण प्रक्रिया मंदावते.भाषिक विकास खुंटतो.परिणामी मूल गुणवत्तेत मागे पडते.विद्यार्थी अनियमित होतो.विद्यार्थ्यांना स्वत:च्या भाषेविषयी न्यूनगंड वाटत असल्यामुळे मुले बोलत नाहीत किंवा कमी बोलतात.परिणामी भाषाविकासास अडथळा निर्माण होतो.अनेक शाळांमध्ये इयत्ता पहिली व दुसरी च्या वर्गामध्ये मुलांना स्वत:च्या भाषेत व्यक्त होण्याची संधी मिळत नाही.वर्गातील काही मुले ज्यांना प्रादेशिक भाषा समजते व स्वत:ची बोलीभाषा असणारी व प्रादेशिक भाषा समजण्यासाठी अडचण असलेली मुले यांच्यात दरी निर्माण होते.

## ❖ शिक्षकांशी संबंधित आव्हाने:

एकाच वर्गात विविध भाषिक पार्श्वभूमी असलेले विद्यार्थी असतात. प्राथमिक स्तरावर अशा प्रकारच्या शिक्षक द्वारा एकाच भाषेतून शिकवणे एक आव्हान आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक समस्या पण त्यांच्या भाषिक विकासास बाधक ठरतो.मुलांमध्ये भीती,संकोच, न्यूनगंड असतो.या अडचणी विद्यार्थी शिक्षकांना सांगू शकत नाही. बरेचदा मदतीची गरज असलेल्या मुलासाठी अध्ययन अध्यापन प्रक्रियेसाठी अनुकूल वातावरण नसते.मुलांना कधी कधी शारीरिक समस्या पण असतात.बोलताना अडखळतात,उच्चार स्पष्ट नसतात, व्यवस्थित ऐकू येत नाही या समस्यांमुळे सुद्धा मुलांचा भाषिक विकास मंदावतो. बरेचदा मुलांची भाषा शिक्षकांना अवगत नसते. शिक्षक-विद्यार्थी, शिक्षक-पालक, शिक्षक- समाज आंतरक्रिया होत नाही.संवादाचा अभाव असल्यामुळे शैक्षणिक विकास प्रक्रिया मंदावते.बोलीभाषेमध्ये साहित्य अल्प प्रमाणात उपलब्ध आहे त्यामुळे शिक्षकांना ती भाषा शिकता येत नाही. काही शिक्षक शाळेच्या परिसरातील भाषा शिकण्याविषयी उदासिन असतात.बहुभाषिक क्षेत्रात काम करताना योग्य अध्यापन शास्त्राचा (pedagogy)चा अभाव असतो.विद्यार्थ्यांच्या भाषिक पार्श्वभूमीविषयी माहितीचा अभाव व त्यविषयी उदासिनतेची भावना यामुळे मुलांची शैक्षणिक प्रगती मंदावते. मुलांच्या परिचयाची घराची आणि परिसराची भाषा आणि शाळेची भाषा यामध्ये असलेली तफावत यामुळे विकासाची प्रक्रिया मंदावते.या तफावतीकडे संसाधन म्हणून न पाहता केवळ अडसर म्हणून पाहण्याचा संकुचित दृष्टीकोन तसेच प्रमाण भाषेच्या शुद्धतेचा शालेय शिक्षणाच्या सुरुवातीपासून धरला जाणारा आग्रह अशा प्रकारची आव्हाने शिक्षकासमोर आहेत.

## ❖ पालकांशी संबंधित आव्हाने:

शाळेचे भाषेचे मध्यम निवडताना पालक विद्यार्थ्याच्या भावी आयुष्याचा विचार करतात.त्यामध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा विचार कधीकधी पालक करताना आढळतात.शालेय नेतृत्वासमोर हे एक मोठे आव्हान आहे. मुलांनी त्यांना अजिबात परिचित नसलेल्या किंवा अल्पपरिचीत भाषेतून शिक्षण घेण्याला अध्यापनशास्त्राची परवानगी नसली त्तरी तो पालकांचा आग्रह असतो. आदिवासी मुलांना काही ठिकाणी त्यांच्या बोलीभाषेतून पुस्तके उपलब्ध करून दिली.(आदिभारती प्रयोग)त्या प्रयोगासाठी आदिवासी भाषी काही बंदिस्त करून ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे आरोप पालकांकडून करण्यात आले होते.

### ❖ समाज संबंधित आव्हाने:

काही समाजामध्ये परंपरागत चालत आलेल्या गोष्टींचा आग्रह धरल्या जातो.समाजामध्ये मुलींवर अनेक बंधन असतात. त्यामुळे विशिष्ट वय झाल्यानंतर शाळेत पाठवत नाहीत.हे शालेय नेतृत्वासमोर असलेले एक मोठे आव्हान आहे.

काही समाजामध्ये अतिशय गरिबीमुळे शिकण्याच्या वयातच मुलांना काम करावे लागते त्यामुळे शाळेत ती येत नाही. अनियमित असतात. सर्व बंधने शालेय नेतृत्वासमोर आहेत. या बाबींवर विचार केला, सामाज सम्पर्क वाढवला, पालकांच्या मनातील गैरसमज दूर केले तर काही प्रमाणात या अडचणी दूर होतील.

## यशोगाथा:

***श्री खुर्शीद कुतुबुद्दीन शेख-***

प्राथमिक शिक्षण हा सध्या अतिशय महत्वाचा विषय आहे. प्राथमिक शाळा या सगळ्या गावांपर्यंत पोहचल्या आहेत. त्या शाळांमधील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे अशी अपेक्षा आहे. वर्गातील मूळ शिकले पाहिजे. त्यासाठी शिक्षकाची भूमिका खूप महत्वाची असते.




गडचिरोली जिल्ह्यातील पंचायत समिती सिरोंचा येथील अतिदुर्गम व नक्षलग्रस्त आदिवासी भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या झिंगानूर या गावातील शाळेत श्री खुर्शीद सर रुजू झाले. सर मोठ्या आनंदाने व उत्साहाने शाळेत रुजू झाले पण जेंव्हा ते वर्गात गेले आणि त्यांनी वर्गातील मुलांसोबत संवाद साधण्याचा प्रयत्न केला तेंव्हा मात्र त्यांचा उत्साह मावळला कारण सरांना येत असलेल्या मराठी,हिंदी,इंग्रजी या भाषा मुलांना समजत नव्हत्या. आणि मुलांना येणाऱ्या माडिया,तेलगु या भाषा

शिक्षकांना समाजत नव्हत्या.त्यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये संवाद होणेच दुर्मिळ होवून बसले होते. फार मोठ्या आव्हानाला खुर्शीद सरांना सामोरे जायचे होते. भाषिक समस्येमुळे बालकांच्या हृदयाचा ठाव घेणे, अध्ययन अध्यापन प्रक्रियेत त्यांना सहभागी करून घेणे कठीण जात होते. बराच विचार केल्यानंतर सरांनी ठरविले की आधी मुलांची भाषा प्रथम शिकावी त्यांनी माडिया, तेलगु भाषांमधील गीते मुलांच्या मदतीने शिकण्याचा प्रयत्न केला. गाणी गातांना मुलं जवळ आली. त्यांना शिक्षक आपले वाटू लागले. गुरु शिष्यातील दुरावा नाहीसा झाला. खुर्शीद सर माडिया, तेलगु भाषा शिकले. आणि त्यांनी अर्धी लढाई जिंकली. आता गरज होती मुलांना बोली भाषेतून प्रमाण भाषेकडे नेण्याची. त्यासाठी शिक्षकांचे प्रयत्न सुरु झाले. शाळेत विविध उपक्रमांचे नियोजन व आयोजन त्यांनी केले. मुलांसोबत काम करतांना ते पालकांपर्यंत पोहचले. गावातील सर्वांसोबत त्यांनी संवाद साधणे सुरु केले. त्यामुळे गाव आणि शाळा यातील सहसंबंध वाढले. गावकऱ्यांना शाळा आपली वाटू लागली. शिक्षकांबद्दल प्रेम व आदर गावकऱ्यांच्या मनात वृद्धिंगत झाला.

माडिया व तेलगु भाषा शिकण्यासोबत विविध उपक्रमांचे आयोजन त्यांनी गावात केले. सर्वप्रथम विद्यार्थ्यांना अध्यायन अध्यापन प्रक्रियेत सहभागी करवून घेणे गरजेचे होते. त्यासाठी प्रथम त्यांनी खालील कार्यक्रमांचे आयोजन केले.

१. तेलगु- माडिया गीत गायन स्पर्धा
२. तेलगु- देशभक्तीगीत नृत्य स्पर्धा
३. तेलगु- बालचित्रपट व कार्टून
४. तेलगुतून मुलाखती घेणे.
५. भाषेतील (मराठी) कवितांना तेलगुमध्ये भाषांतरित करणे.
६. बाहुलीनाट्यातून तेलगु नाटिका भाषांतरित करणे.

वरील उपक्रमांमुळे विद्यार्थी बरेच मोकळे झाले होते. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांसोबत राहून शिकण्याची व शिकविण्याचे अनेक मार्ग मोकळी करून दिली होती. कारण त्यांच्या मध्ये निर्माण झालेली ऊर्जा ही मुलांना मराठी, इंग्रजी व हिंदी भाषा शिकण्यास उपयुक्त ठरली. विद्यार्थी आता मराठी व हिंदी बोलायला लागली. विद्यार्थ्यांचा शिक्षकांवरील प्रेम, विश्वास यामुळे हे सर्व सहज शक्य झाले. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल होत होता. विद्यार्थ्यांना आता तेलगु, माडिया, गोंडी सोबतच मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषा पण बोलता येऊ लागल्या. विद्यार्थी बहुभाषिक झाले. व त्यांच्या सोबत शिक्षकांना संवाद साधता येणं शक्य झालं. हा शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा उत्साह असाच कायम टिकून

राहावा यासाठी शिक्षकांनी अनेक सहशालेय उपक्रमांचे नियोजन व आयोजन केले. त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत.

- शाळा- एक शैक्षणिक उपक्रम संशोधन केंद्र.
- व्यसनमुक्ती अभियान-
- भाषीक विकासासाठी- *'मी रिपोर्टर'* उपक्रम.
- शालेय लघुपट निर्मिती ( Guru तेलगु short film. )
- डॉ बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय
- शालेय पुस्तक प्रकाशन ( School Books Publication )
- शालेय बाहुली नाट्यमंच
- प्रेरणा व्यक्तिमत्व मुलाखत
- नाविन्यपूर्ण विज्ञान प्रयोग
- चालता फिरता बोलता खुला वर्ग



शाळेतील विद्यार्थी अनेकदा व्यसनांच्या आहारी गेलेले दिसून आले. जसे खर्रा, गुटखा, तंबाखू खाण्याची सवय मुलांना आहे. असे सरांना जाणवले. तेंव्हा विद्यार्थ्यांसाठी व्यसनमुक्ती अभियान राबवून विद्यार्थी तंबाखूमुक्त व गुणवत्तायुक्त कशी बनतील याकडे सरांनी कटाक्षाने लक्ष पुरविले. विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना मिळावी त्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास व्हावा म्हणून ' मी रिपोर्टर ' यासारखे

उपक्रम घेण्यात आले. वाचन विकासासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय तयार केले. त्याद्वारे मुलांना वाचनाची गोडी वाढीस लागली. विद्यार्थ्यांच्या कला कौशल्याला वाव देण्यासाठी तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांच्या मनात मूल्यवर्धनाचे  बीज रोवण्यासाठी शालेय लघुपटाची निर्मिती केली. त्यातून उत्कृष्ट अभिनय करणाऱ्या कलाकारांचा शोध लागला. एका दुर्गम भागातील शाळेमध्ये ज्या शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी, हिंदी या भाषा येत नाही, समजत नाही अशा विद्यार्थ्यांच्या विकासासाठी खुर्शीद सर तन मन धनाने काम करू लागले. व त्यांनी शाळेचे नंदनवन बनविले.

शालेय लघुपट निर्मिती करून गुरु नावाचा तेलगु भाषेतील short film पण सरांनी तयार केली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभिनय क्षमतेला वाव मिळाला. एखाद्या यशस्वी व्यक्तिमत्वाची विद्यार्थ्यांसमोर मुलाखत घेतली जाते. ही मुलाखत विद्यार्थी महिन्यातून एकदा घेत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते. व आपण ही मोठे होवून असेच यशस्वी व्हायचे या विचारांना खतपाणी मिळते.

विद्यार्थ्यांच्या शोधक बुद्धीला चालना देण्यासाठी नाविन्यपूर्ण विज्ञान प्रयोग हा उपक्रम घेण्यात येतो. निसर्गावर प्रेम करणारे, निसर्गाच्या सानिध्यात असणारे झिंगानूर गावातील विद्यार्थ्यांनी खुर्शीद सरांच्या सोबत प्रगतीच्या दिशेने वाटचाल केली आहे.  एक स्वच्छ सुंदर शाळा ही गावासाठी अभिमानाची बाबा असते. म्हणून  समस्येत अडकून शाळेची  विकासगती कमी होवू नये म्हणून प्रत्येक समस्येचे उपाय शोधण्यासाठी शाळा एक केंद्रच बनली. समस्या जाणवली की तिचे निरसन करणे या केंद्रामुळे अर्थात सकारात्मक शालेय नेतृत्वामुळे शक्य झाले आहे.



**चिंतनात्मक प्रश्न---**

१ झिंगानूर शाळेत रुजू झाल्यावर खुर्शीद सरांचा उत्साह का मावळला?

२ ........आणि अर्धी लढाई जिंकली असे खुर्शीद सरांच्या बाबत का म्हटले आहे?  स्पष्ट करा

३ विद्यार्थ्यांचे शिक्षकावरील प्रेम व विश्वास यामुळे कोणत्या गोष्टी साध्य झाल्या?

४ शाळा-- एक शैक्षणिक उपक्रम संशोधन केंद्र असे का म्हटले आहे?

५ विद्यार्थांना व्यसनमुक्त करण्यासाठी खुर्शीद सरांनी केलेल्या कार्याचे विवेचन करा.

**विचार करू या चर्चा करू या–**

**परिस्थिती -1**

अतिशय दुर्गम भागातील गावं आहे .तिथे एक शाळा आहे. गावात 20-22 पट असलेली एक शाळा आहे.गावात गोंडी तेलगु भाषा बोलली जाते. वर्ग पहिली ते पाचवी पर्यंत शाळा आहे.या शाळेत येणाऱ्या शिक्षकांना मराठी **भाषा येते.ते प्रमाण मराठी भाषा बोलतात.आपले बोलणे विद्यार्थ्याला** समजावे असे शिक्षकाला वाटते. पण मराठी प्रमाण भाषा मुलांना समाजात नाही.त्यामुळे शिक्षक रागावतात.मुलांना शिक्षकाची भीती वाटते. त्यांनी शाळेत येणे बंद केले आहे.शिक्षकही या परिस्थितीला कंटाळले आहेत**.अशा वेळी तुम्ही काय कराल?**

**परिस्थिती -2**

वर्ग पहिली ते सातवी पर्यंत शाळा आहे. शाळेत इयत्ता पहिली व दुसरीला शिकवणाऱ्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कोरकू या बोलीभाषेला स्वीकारले आहे.त्यांनी या भाषेतील काही शब्द स्वत: शिकून घेतले.विद्यार्थ्यांसाठी कोरकू भाषेतील काही पुस्तक मागवली.व ती पुस्तकं मागवली.ती पुस्तकं विद्यार्थ्यांना दिले.बोलीभाषा स्वीकारणे, बोलीभाषेतून संवाद साधणे या मधून अध्ययन अध्यापन प्रक्रियेला सुरुवात झालेली आहे.अचानक पालकांनी मुलांना केवळ आदिवासी भाषेमध्ये बंदिस्त करून ठेवण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप शिक्षकावर केले.गावात त्या शिक्षकाच्या विरोधात वातावरण तयार झाले आहे.

**अशा वेळी तुम्ही काय कराल?**

## शाळा विकास आराखडा (SIP)-

तुम्ही शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहात. शाळेविषयीची सर्व माहिती तुमच्याजवळ आहे. शाळेचा परिसर, गाव, पालक, गावातील सुखसोयी, पर्यवेक्षीययंत्रणा, सामाजिक वातावरण, शाळेचा प्रकार, पट, शाळेची प्रगती,विकासास वाव असणाऱ्या बाबी इत्यादी संदर्भात तुमचा अभ्यास झालेला आहे.आता तुम्हाला वरील सर्व बाबी गृहीत धरून तुमच्या शाळेचा शाळा विकास आराखडा तयार करायचा आहे.

## मार्गदर्शक सूची -

## आपण हे करू शकाल !

बहुभाषिक क्षेत्रात काम करणाऱ्या मुख्याध्यापक/शिक्षक यांच्या यशोगाथांचे वाचन केल्यास अडचणीच्या वेळी नेमके काय करायचे याचा अंदाज येईल. विद्यार्थ्यांच्या, पालकांच्या मदतीने बोलीभाषेतील पारंपारिक गाणी, कथा, कविता, म्हणी,चित्रे यांचा संग्रह करून संस्कृती जतन करण्यास हातभार लावता येईल. शिक्षकांना मुलांच्या भाषा मुलांकडून शिकता येतील.मुलांना पण आपल्याकडून शिक्षक शिकत आहेत याचा आनंद होईल व त्यांचा आत्मविश्वास वाढेल. कन्नड, तमिळ,गुजराती ,सिंधी,तेलगु,हिंदी,उर्दू,इंग्रजी भाषिकांना शिकवण्यासाठी अनेक व्हिडीओ इंटरनेट वर उपलब्ध आहेत.त्यांचा वापर करून शिक्षक आवश्यक त्या भाषांची अधिक माहिती मिळवून भाषा शिकू शकतील. सुरुवातीची दोन वर्षे पहिली व दुसरीतील मुलांची बोलीभाषा स्वीकारून इयत्ता तिसरीपासून त्यांना हळूहळू प्रमाण भाषेकडे नेता येईल.



**मोड्यूलची उपयुक्तता -**

सदर मोड्यूल बहुभाषिक क्षेत्रात काम करणाऱ्या मुख्याध्यापाकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे .शाळेचे नेतृत्व करत असताना मुख्याध्यापकांसमोर अनेक प्रश्न नेहमीच असतात.अनेक आव्हानं त्यांच्यासमोर असतात.प्रामुख्याने ज्या भागात मुलांची मातृभाषा मराठीपेक्षा वेगळी आहे अशा वेळी मराठी माध्यमात शिकताना सुरुवातीच्या काळात बालवाडी,इयत्ता पहिली,इयत्ता दुसरी मध्ये आशय समजून घेताना मुलांना अडचणी येऊ शकतात.अशा वेळी शिक्षकांनी बहुभाषिकत्वाची संकल्पना समजून घेणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या वर्गातील अध्ययन प्रक्रियेत बोलीभाषा अडसर म्हणून ठरत असेल तर मुख्याध्यापक तसेच शिक्षकाला प्रथम त्याची बोलीभाषा स्वीकारून त्या भाषेत मुलांसोबत संवाद साधून नंतर त्या विद्यार्थ्याला प्रमाण भाषेकडे न्यावे लागेल.ह्या सर्व कृती करण्यासाठी लागणारी मानसिकता विकसित होण्याकरिता या मोड्यूलचा उपयोग होणार आहे.

भारतामध्ये भाषिक विविधता आहे.आपल्या देशाचे हे एक वैशिट्य आणि वैभव आहे. ते आपल्याला टिकवून ठेवायचे आहे.काही बोलीभाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.तेव्हा या बोलीभाषाना व त्या भाषा बोलणाऱ्या समुदायाला कमी न लेखता हा पारंपरिक वारसा आपल्याला जतन करून ठेवायचा आहे. हा दृष्टीकोन मुख्याध्यापक व शिक्षकांमध्ये विकसित झाला तर ते नक्कीच बहुभाषिक समुदायाला न्याय मिळवून देतील.

अनेक अडचणींवर  मात करून काही मुख्याध्यापकांनी शाळेत यशस्वीपणे काम केलेले आहे.या मुलांना आपलेसे करून त्यांच्या गुणवत्ता विकासासाठी या लोकांनी कशी मेहनत घेतली,विविध उपक्रमांचे शालेय स्तरावर आयोजित केले.याविषयी मोड्यूल मध्ये दिलेल्या याशोगाथांमधून मुख्याध्यापकांना मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. तसेच विविध स्तरावरील आव्हानांचे स्वरूपकेले विषद केलेले आहे. या आव्हानांवर मात करण्यासाठी असलेली विचार प्रक्रिया,त्या विषयीचे चिंतन, मंथन या विषयीची माहिती या मधून मिळते. एकूणच एक मुख्याध्यापक म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास करण्यासाठी व शाळेतील शिक्षकांना दिशा देण्यासाठी काय करता येईल या विषयीची माहिती या मोड्यूल मधून मिळते.

**संदर्भ सूची :**


- महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई, मार्च 2011,निश्चयाचे बळ
- किशोर दरक TATA TRUST महाराष्ट्रातील बहुभाषिक शिक्षण
- संचालक विद्या प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य पुणे; मार्च 2016; बहुभाषिक परिस्थितीतील अध्ययन-अध्यापन शिक्षक मार्गदर्शिका
- संचालक महाराष्ट्र विद्या प्राधिकरण पुणे;जानेवारी 2018; शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य
- संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे,डिसेंबर 2019,निष्ठा मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार
- https://www.youtube.com/watch?v=iJAatN4PMBA
- https://www.youtube.com/watch?v=tGaRUVx1tPc
- https://www.youtube.com/watch?v=UtpNDCEI5QA
- https://study.com/academy/lesson/multilingualism-definition-role-in-education.html
- https://study.com/academy/lesson/multilingualism-definition-role-in-education.html
- https://www.youtube.com/watch?v=JXMhAzgcdzM
- https://www.youtube.com/watch?v=bK1jnwi-eSE
- https://www.youtube.com/watch?v=oHQwEbXldn4
- https://www.youtube.com/watch?v=z16IrwIi8O0



डॉ.सीमा पुसदकर

**अधिव्याख्याता**

**प्रादेशिक विद्या प्राधिकरण**

**नागपूर, महाराष्ट्र**